REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# आंतरराष्ट्रीय संबंध आणि जागतिक संघटना

प्रा.डॉ.देविदास ग्यानुजी नरवाडे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख , गोदावरी कला कनिष्ठ व वरिष्ठ
महाविद्यालय अंबड, जि.जालना.

## प्रस्तावना :

प्राचीन काळापासून आंतरराष्ट्रीय संबंधाचे अस्तित्व आहे. ग्रीक मधील प्राचीन नगरराज्यीय व्यवस्था त्यांचे परस्पर संबंध, प्लेटो, ॲरिस्टॉटल यांचे रिपब्लिक, पॉलीटिक्स या ग्रंथाचे लेखन, कौटिल्याचे अर्थशास्त्र इत्यादी ग्रंथात राजकीय संबंध, राजकीय व्यवस्था यांच्या स्वरूपाचे विवेचन आढळते.

पूर्वी आंतरराष्ट्रीय संबंध व्दिपक्षीय व प्रादेषिक स्वरूपाचे होते. व्यापकता राजकीय सैन्य संबंधापुरते मर्यादीत होती. कालांतराने औद्योगिक क्रांती झाली. विषेषतः युरोपिय राष्ट्रात आंतरराष्ट्रीय संबंधाला महत्व प्राप्त झाले. इंग्लंड, फ्रान्स, इत्यादी राष्ट्रांनी साम्राज्य विस्तार करण्यास सुरूवात केली. आशिया, आफ्रिका खंडात या राष्ट्रांनी आपले साम्राज्य निर्माण केले. औद्योगिक क्रांतीमुळे युरोपिय राष्ट्रांच्या उत्पादनात प्रचंड वाढ झाली, आणि त्या प्रचंड उत्पादन वाढीस बाजारपेठ मिळणे आवष्यक होते. कच्च्या मालाची आवश्यकता या कारणांमुळे या राष्ट्रांनी विसाव्या शतकाच्या दुस—या शतकापर्यंत जगभर युरोपिय राष्ट्रांनी आपले साम्राज्य निर्माण केले. 1789 च्या फ्रान्सच्या राज्यक्रांतीने राष्ट्रवादाच्या प्रखर स्वरूपास जन्म दिला. पुढे पहिले महायुध्द झाले. या युध्दानंतर आंतरराष्ट्रीय संबंधाला जागतिक पातळीवर महत्व प्राप्त झाले. पहिल्या महायुध्दाच्या कारणामध्ये राष्ट्रा—राष्ट्रातील परस्पर अविश्वास, जागतिक आंतरराष्ट्रीय संघटनेचा अभाव ही कारणंही समाविष्ट करणे आवष्यक ठरते. 10 जानेवारी 1920 ला राष्ट्रसंघाची स्थापना हि आंतरराष्ट्रीय संबंधाना नवे स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी झाली. परंतु स्वप्नाळू, महत्वकांक्षा, आदर्श तथा शक्तीषाली राष्ट्राच्या कृत्यांना पायबंद घालू शकण्यायोग्य सशक्त यंत्रणा निर्माण न झाल्यामुळे राष्ट्रसंघ अपयशी ठरला. आणि दुसरे महायुध्द झाले. यानंतर ख—या अर्थाने आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासास अनेक लेखक, विचारवंत, तज्ञांनी व्यापक पध्दतीने महत्व दिले. त्यातूनच सयुक्त राष्ट्र संघटना ( UNO ) स्थापने विषयी निर्णय झाला. आणि पुन्हा एक जागतिक संघटना ज्यामध्ये शक्तीशाली राष्ट्रांनी पुढाकार घेवून स्वातंत्र्य, सार्वभौम राष्ट्रांना सुरक्षेची हमी देण्याचे कबुल केले. जगात स्थायी शांती आंतरराष्ट्रीय सहकार्याची भावना निर्माण करण्यासाठी आणि युध्दांते त्रस्त माणसाच्या विकासासाठी कार्य करू शकेल अशी एक आंतरराष्ट्रीय संघटना अटलांटिक चार्टर नुसार, 1943 च्या मास्को सम्मेलनात दृढ निश्चयाने आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्याचा मार्ग प्रशस्त करण्यात आला. 24 आक्टोंबर 1945 ला संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना करण्यात आली.

यानंतर आंतरराष्ट्रीय संबंधावर प्रभाव निर्माण करणा—या अनेक संघटना स्थापना करण्यात आल्या आहेत.



## उद्देश :

1. आंतरराष्ट्रीय सहकार्य शांतीसाठी आंतरराष्ट्रीय संघटनेचा सहभाग स्पष्ट करणे.

2. राष्ट्रीय हित आणि आंतरराष्ट्रीय संघटनांची कार्य पध्दती स्पष्ट करणे.
3. आंतरराष्ट्रीय संघटनेचा आंतरराष्ट्रीय संबंधावर पडलेला सकारात्मक नकारात्मक परिणाम स्पष्ट करणे.
4. आंतरराष्ट्रीय संघटनाची आवश्यकता स्पष्ट करणे.

### गृहितके :

1. आंतरराष्ट्रीय संघटना आंतरराष्ट्रीय शांततेसाठी कार्य करतात.
2. आंतरराष्ट्रीय संबंधावर आंतरराष्ट्रीय संघटना परिणाम करतात.
3. आंतरराष्ट्रीय संघटनावर राष्ट्रांचे वर्चस्व आहे.
4. आंतरराष्ट्रीय संघटना आंतरराष्ट्रीय राजकारणाचे डावपेच आखण्याचे ठिकाण आहे.

### आंतरराष्ट्रीय संघटना :

### 1-01- संयुक्त राष्ट्र संघटना : United state organization

जगातील बहुतांश स्वातंत्र्य सार्वभौम राष्ट्रे संयुक्त राष्ट्र संघटनेची सदस्य राष्ट्रे आहेत. संयुक्त राष्ट्र संघटनेची 195 देश आजमितीस सदस्य राष्ट्र आहेत.

1. शांती, सुरक्षेची रक्षा करणे.
2. मानवी अधिकाराचे संरक्षण.
3. जगाचा सामाजिक व आर्थिक विकास करणे.
4. आंतरराष्ट्रीय कायदा सक्षम करणे.
5. प्रभावशाली आंतरराष्ट्रीय संघटन निर्माण करणे.

संयुक्त राष्ट्र संघटनेमुळे जगातील स्वातंत्र्य देशाच्या संरक्षणाची जबाबदारी या आंतरराष्ट्रीय संघटनेकडे आहे. जगातील अनेक राष्ट्रांना मानव अधिकाराच्या बाबतीत संयुक्त राष्ट्र संघटनेकडून अनेक कायदे करण्यासाठी प्रेरित केले आहे. आंतरराष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या धर्तीवर राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची निर्मिती करणे सदस्य राष्ट्रांनी मान्य केले आहे. त्यामुळे जगातील मानवी जमातीच्या अन्याय, अत्याचाराविरोधात दाद मागता येउ शकते. युध्दापासून जगाला वाचविण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटना प्रयत्न करत असते. शस्त्रास्त्र स्पर्धा, अण्वस्त्र अणुबॉम्ब, रासायनिक हत्यारे यावर प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधांना एक प्रकारे संचलित करण्याचे कार्य संयुक्त राष्ट्र संघटना करत असते. सुरक्षा परिषदेतील कायम सदस्यांच्या कार्य पध्दती नुसार आंतरराष्ट्रीय संबंधाचे नियमन होत असते.

जगातील विविध भागातील संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्य राष्ट्र

तक्ता क. 1.1

| अ.क. | विभाग | राष्ट्रांची संख्या |
|---|---|---|
| 01 | आफ्रिका | 54 |
| 02 | आशिया | 48 |
| 03 | युरोप | 44 |
| 04 | लॅटीन अमेरिका व लॉरिबियन | 33 |
| 05 | ओशनिया | 14 |
| 06 | उत्तर अमेरिका | 02 |
| एकुण | | 195 |

जगातील प्रत्येक खंडातील राष्ट्रे युनोची सदस्य राष्ट्र आहेत. त्यामुळे जागतिक राजकारणावर आंतरराष्ट्रीय संबंधावर या आंतरराष्ट्रीय संघटनेचा निश्चितच प्रभाव पडत असतो.

### जागतिक व्यापार संघटना ( World Trade organization ) :

जागतिक व्यापार संघटनेची स्थापना 1 जानेवारी 1995 या वर्षी झाली. एकूण सदस्य राष्ट्रांची संख्या 164 एवढी आहे. भारत हि या संघटनेचा सदस्य आहे.

जगात व्यापार उद्योगात युरोपिय राष्ट्र पुढारलेली आहेत. त्यांनी व्यापारिक दृष्टिकोनातून वसाहती निर्माण केल्या. अविकसीत आशिया, आफिका खंडात आपल्या आर्थिक साम्राज्य निर्माण करण्याच्या हेतुने प्रचंड आर्थिक पिळवणुक केली. त्यातुन आर्थिक विषमता निर्माण झाली. गरिब – श्रीमंत राष्ट्रांची विषम विभागणी झाली. गट–निरपेक्ष आन्दोलनातील राष्ट्रांनी 1973 पासून भेदभाव पूर्ण अर्थव्यवस्थेला विरोध करत नव्या आर्थिक व्यवस्थेची मागणी केली होती. दुस–या महायुध्दानंतर आर्थिक साम्राज्यवादाचा –हास व्हायला सुरूवात झाली. नव्या भांडवलशाही बलाढय राष्ट्रांनी जागतिक व्यापाराची सुत्रे आपल्या हिताच्या दृष्टिने वापर करण्यास सुरूवात केली. परिनामी आर्थिक विषमता कमी होण्याऐवजी ती वाढतच गेली. विदेशी गुंतवणूक आणि बहुराष्ट्रीय कंपन्यामुळे आभासी विकासाचे चित्र उभे राहीले आहे. प्रत्यक्षात गरिबांच्या गरिबीत आणखी वाढ होतांना दिसत आहे.

व्यापार संघटनेच्या नियम अटी ह्या विकसनशील देशांच्या सार्वभौमत्वास बाधक ठरत आहेत. पुढारलेले देश आपल्या देशातील शेतक–यांना प्रचंड अनुदान देवुन कृषी उत्पादनाच्या आपल्या उत्पादनास जागतिक बाजार पेठेत कमी भावात विकत आहेत. परिणामी विकसनशिल देशातील शेतक–यांना त्याचे प्रचंड नुकसान सहन करावे लागत आहे. उत्पादनावर आधारीत भाव न मिळाल्यामुळे विकसनशील देशातील शेतक–यांना त्याचे प्रचंड नुकसान सहन करावे लागत आहे. उत्पादनावर आधारीत भाव न मिळाल्यामुळे विकसनशील देशातील शेतक–यांची आर्थिक स्थिती प्रचंड बाधीत होवून शेतकरी आत्महत्या पर्यंत टोकाचे पाउल उचलण्यास मजबूर झाले आहेत. आर्थिक समता प्रस्थापित करण्याच्या गोंडस भांडवलशाही व्यवस्थेने जगातील विकसनशील राष्ट्रावर बहुराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी सारख्या व्यवस्थेने नवभांडवलशाही आर्थिक साम्राज्य व्यवस्था बळकट करण्याचे कार्य केले आहे. गॅटकराराच्या कलम 2 मध्ये Most Fevorate Nation ( MFN ) ची देण्याची तरतूद आहे. ज्या राष्ट्रास आपण ( MFN ) दर्जा दिला त्या राष्ट्रांकडून आयात करण्यात येणा–या उत्पादनास आयात शुक्कात सवलत घ्यावी लागते. परंतु त्यात इतर WTO सदस्यराष्ट्रास ही सवलत द्यावी लागते. परिणामी विकसनशील राष्ट्रांची आयात जास्त असल्याकारणाने या राष्ट्राचे आयात शुक्काचे मोठे नुकसान होते. पर्यायाने विकसीत राष्ट्राचे उत्पादन मोठ्या प्रमाणात निर्यात होते. पर्यायाने त्यांच्या नफ्यात वाढ होते.

### आंतरराष्ट्रीय नाणे निधी International monetary fund :

हि एक जागतिक वित्तीय व्यवस्थेवर देखरेख ठेवणारी महत्वपूर्ण आंतरराष्ट्रीय संघटना आहे. आंतरराष्ट्रीय नाणे निधी या संघटनेची स्थापना 27 डिसेंबर 1945 रोजी झाली. नाणे निधीची सभासद संख्या 189 आहे. या संघटनेचे काही मुख्य उद्देश आहेत.

1. आंतरराष्ट्रीय व्यापारातील देवाण–घेवाणीत समतोल राखणे.
2. परदेषी व्यापारातील असमतोल दूर करणे.
3. परदेषी चलन प्राप्त करून देणे.

या संघटनेच्या मार्फत सभासद राष्ट्रास विविध प्रकारे अर्ज पुरवठा केला जातो. देशाचा कोटा आणि निधीकडे त्या देशाचा असणारा चलनसाठा यांच्यातील फरकाएवढी रक्कम सभासदांना कधीही काढता येते. एखाद्या देशाचा कोटा रक्कमेच्या पंचवीस टक्यापर्यंत विनाअट कर्ज मिळते. परंतु अन्य प्रकारच्या कर्जासाठी नाणे निधी जाचक अटी लादत असते. नाणेनिधीकडून सभासद देशांकडून आर्थिक बदलाचे लेखी आश्वासन घेतले जाते. अनेक जाचक अटी लावून कर्ज दिले जाते.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी सभासद राष्ट्रांना कर्ज देवून त्यादेशीत व्यवस्थेला नाणेनिधीसाठी पुरक कायदे करण्यास, कार्य करण्यास भाग पाडते. त्यामुळे राष्ट्राच्या सार्वभौम सत्तेचे स्वरूपास बाधा पोहचत असते. आंतरराष्ट्रीय नियम, कायद्याचे पालन या राष्ट्रांना करावे लागते. म्हणजेच सभासद देशातील आर्थिक व्यवस्थेत हस्तक्षेप होतो हे स्पष्ट आहे.

या संघटनेवर विकसीत राष्ट्रांचे वर्चस्व आहे. त्यांनी अविकसित सभासद राष्ट्रांवर अनेक अटी, नियम लावून आपल्या प्रभावाखाली ठेवण्याचे कार्य केले. विशेष म्हणजे नाणेनिधी चा उपयोग आंतरराष्ट्रीय संबंधावर प्रभाव टाकण्याचे एक साधन म्हणून अमेरिकेसारखे प्रगत राष्ट्र करत असतात. अनेक राष्ट्रांनी नाणेनिधीच्या कार्य पध्दतीवर आक्षेप घेतले आहेत.

अशा पध्दतीने आंतरराष्ट्रीय संबंधाची सुत्रे अनेक बडी राष्ट्रे आपले राष्ट्रीय हित समोर ठेवून परराष्ट्रधोरण आखत असतात जागतिकी करणानंतर आंतरराष्ट्रीय संबंध हे आर्थिक संबंधावर किंवा आर्थिक हितसंबंधाच्या भोवती गुंतल्याचे स्पष्ट होते.

जगातील दोन विचारप्रणाली म्हणजे भांडवलशाही लोकशाही व साम्यवादी राजकीय व्यवस्था या दोन्ही विचाराच्या अधीन राजकीय व्यवस्था अस्तित्वात आहेत. अमेरिकेत भांडवलशाही लोकशाही तर चीन, रशिया या देशात साम्यवादी एकपक्षीय राजकीय व्यवस्था आहे. 1991 ला रशियाचे विघटन झाले. मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी ग्लासनोस्त व पेरिस्त्रोईला म्हणजे सामाजिक मुदद्याविषयी चर्चा व पेरिस्त्रोईला म्हणजे राजकीय व आर्थिक घटकांची पूनर्रचना करणे. अशा पध्दतीने महाबलाढ्य रशियाने आपल्या धोरणात बदल केला तर चीन या आर्थिक महासत्तेने 1992 ला जागतिकीकरणाचा स्वीकार केला. परंतु चीनने आपल्या आर्थिक राष्ट्रीय धोरणात विशेष बदल केला नाही. बहुराष्ट्रीय कंपन्यांना कमी महत्वाच्या व्यवसाय, उद्योग घटकात गुंतवून महत्त्वाचे उपक्रम शासकीय मालकीचे ठेवले आहेत. युआन हे चीनचे चलन सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे चीनने जागतिक व्यापार संघटनेचे सदस्यत्व स्वीकारूनही आपली एकपक्षीय सत्ता मजबूत करून भांडवलशाही राष्ट्रांच्या चीनच्या सत्तेचा भांडवलशाहीच्या मार्गाने दिलेले आव्हान मोडून काढले आहे. चीन आपली एकपक्षीय साम्यवादी हुकूमशाही सत्ता आणखीन बळकट केली. सरंक्षण, आर्थिक बाबतीत चीन ने प्रचंड प्रगती करून अमेरीकेला स्पर्धक म्हणून स्वतःला सिध्द केले आहे.

## समारोप :

आंतरराष्ट्रीय संबंधाच्या बाबतीत आधुनिक काळात या बडया आर्थिक महासत्ते बरोबर भारतासारख्या मोठ्या लोकशाही व भविष्यातील आर्थिक महासत्ता होणा–या देशास आंतरराष्ट्रीय संबंधात महत्वपूर्ण स्थान आहे. भारतात जगातील मोठा ग्राहक वर्ग लोकसंख्येच्या स्वरूपात उपलब्ध आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सुरक्षा परिषदेच्या कायम सदस्यात्वासाठी भारत हा एकमेव व प्रमुख दावेदार आहे. आंतरराष्ट्रीय संबंधाची व्याप्ती आधूनिक काळात व्यापक झाली आहे. राष्ट्रा–राष्ट्रातील सामाजिक, आर्थिक, राजकीय संबंधाबरोबरच सांस्कृतीक पर्यावरण इत्यादी घटकांचा समावेश होउन राष्ट्रातील जनतेचे प्रभाव आत आंतरराष्ट्रीय संबंधावर निर्माण होत आहे. भारत आंतरराष्ट्रीय संबंधातील महत्वपूर्ण घटक आहे.

अंतर व काळाच्या पुढे आज आंतरराष्ट्रीय संबंधाला स्वरूप प्राप्त झाले आहे. संयुक्त राष्ट्र संघटना, जागतिक व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय ओपेक, आशियात सार्कनाणेनिधी इत्यादी प्रभावशाली जागतिक व क्षेत्रीय संघटन निर्माण झाले आहेत. तंत्रज्ञान, औद्योगिक विकास, आर्थिक विकास मानवी विकास निर्देशांक इत्यादी घटक आंतरराष्ट्रीय संबंधाच्या बाबतीत महत्वपूर्ण ठरत आहेत. अण्वशास्त्रांच्या निर्मितीमुळे मानवी जमातीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधाच्या संवेदनशीलतेला गंभीरपणे हाताळणे आवश्यक आहे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय संबंधावर सकारात्मक समानतेवर आधारीत, शांततेसाठी कार्य करणा–या आंतरराष्ट्रीय संघटनांची गरज आज निर्माण झाली आहे.

## संदर्भसूची


1. मुन्द्रिका प्रसाद, अन्तर्राष्ट्रीय सम्बन्ध, अर्जून पब्लिशिंग हाउस, नई दिल्ली, प्रथम संस्करण 2005
2. डॉ.विनोद कुमार पाल, अन्तर्राष्ट्रीय राजनीतिक सम्बन्ध, डिस्कवरी पब्लिशिंग हाउस प्रा.लि. नई दिल्ली, प्रथम संस्करण 2010
3. डॉ.मानिक लाल गुप्त, अन्तर्राष्ट्रीय सम्बन्ध, अटलांटिक पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नई दिल्ली.
4. डॉ.शैलेन्द्र देवळाणकर, समकालीन जागतिक राजकारण प्रमुख प्रश्न, विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद, प्रथमा आवृत्ती जून 2005
5. डॉ.सुनिल दाते, आंतरराष्ट्रीय संबंध व राजकारण, विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद, जुलै 1998